६) पोरी पिंगा ग पोरी पिंगा ग पोरी पिंगा ग पोरी पिंगा!
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, रात जागवली पोरी पिंगा
फेटा बांधल्याला भाऊ माझा ग जावई तुझा ग पोरी पिं
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, झोप चाळिवली पोरी पिं
शालू नेसल्याली भैन माझी ग सून तुझी ग पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, मागं घालिवली पोरी पिं
भाऊ माझा गं, तो ब राजा ग, अग जा जा ग पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यान मला बोलिवली, मला बोलिवली पोरी पिं
तुझ्या भावाचं डोळं चकणं ग, रूप हेकणं ग पोरी पिंगा
भैन माझी ग लेक इंद्राची कोर चंद्राची पोरी पिंगा!
तुझ्या भैनीचं नाक नकटं ग त्वांड चपडं ग पोरी पिंगा
माझ्या भावाचा भारी दरारा पळती थरारा सारे पिंगा!
भाऊ तुझा ग भितो झुरळाला, काळ्या उंदराला पोरी पिं
भैन माझी ग जशी कोकिळा गाते मंजुळा पोरी पिंगा!
तुझ्या भैनीचं काय नरडं ग कावळं वरडं ग पोरी पिंगा
अशा भैनीला कोण आणणार कशी नांदणार पोरी पिंगा
भैन माझी ग जाई बावरून घेई सावरून पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवलं, लुगडं नेशिवलं पोरी पिं

Date
Page
Smt. V.D. Sr. C.

३) नाच ग घुमा, कशी मी नाचू ?
ह्या गावचा, त्या गावचा शोनार नाही आत्या
जोडवी म्हाई मत्या कशी मी नाचू ?
नाच ग घुमा !
ह्या गावचा, त्या गावचा शिंपी म्हाई आत्या
चोली म्हाई मत्या कशी मी नाचू ?
नाच ग घुमा !
ह्या गावचा, त्या गावचा कासार म्हाई आत्या
बांगडी म्हाई मत्या कशी मी नाचू ?
नाच ग घुमा !

४) फू बाई फू फुगडी चमचम् करतीया बुगडी !
वाट बाई वाट चंदनाची वाट
पतीदेव बहात्यात माडीवर वाट
बारा घरच्या बायका एक जागी मिळू या
चला झिम्मा खेळू या ग चला झिम्मा खेळू या !
खेळ बोल्यते त्याडकी घरी गोकूळ साजणी
वसुदेव देवकीचा कान्हा खेळतो अंगणी
बाळा नवसाच्या माझा त्याची दृष्ट काढू या
चला झिम्मा खेळू या ग चला झिम्मा खेळू या
घुमु दे घागर घुमु दे खेळात जीव ह्यो रमु दे
गाउनी घागर फुकतीया, भांग नि म्होर झुकतीया
नाचून बाई माझी दमू दे खेळात जीव ह्यो रमु दे
घुमु दे घागर घुमु दे !

५) आंबा पिकतो रस गळतो कोकणचा राजा
झिम्मा खेळतो.
झिम पोरी झिम कपाळाचा भोम
झिम शेला फुटून पोरी आल्या उठून
सरसर गोविंदा येतो. मजवरी घुल्याय फेकीतो
या या झिम्मा खेळाया
आमच्या वेण्या घाल्याया.
एक वेणी मोकळी

माणिकमोत्यांचा लोणारा.
लोणाराशी काढ त्या
आम्ही बहिणी लाडक्या

एक लिंबू झेलू बाई दोन लिंब झेलू
दोन लिंबू झेलू बाई तीन लिंब झेलू
तीन लिंबू झेलू बाई चार लिंब झेलू
चार लिंबू झेलू बाई पाच लिंब झेलू

पाचा लिंबाचा पानोठा
माळ घालू हनुमंता
हनुमंताची निळी घेडी
येता जाता कमळे तोडी

कमळाच्या पाठीमागे लागली राणी
अग अग राणी इथे कुठे पाणी
पाणी नव्हे यमुना जमुना
यमुन जमुनाची बारीक वाळू
तेथे खेळे चिल्लार बाळू
चिल्लार बाळाला भूक लागली
निज रे निजरे चिलार बाळा
मी तर जाते सोनार वाडा

सोनार दादा सोनारदादा
गौरीचे मोती झाले का नाही
गौरीच्या घरी तांब्याच्या चुली
भोजन घालते आवळीखाली
उष्ट्या पत्रावळी चिंचेखाली
पान सुपारी उद्या दुपारी

१०) गण्या गुलाल उधळीतो उधळीतो...
तुझ्या गुलालाचा भार माझ्या वेण्या
झाल्या लाल जाऊन यशोदेला सांग
कृष्ण झिम्मा खेळतो गण्या
गुलाल उधळीतो. तुझ्या गुलालाचा
भार माझं पैंजण झालं लाल जाऊन
यशोदेला सांग, कृष्ण झिम्मा खेळतो
गण्या गुलाल उधळीतो. तुझ्या
गुलालाचा भार माझ्या जोडव्या झाल्या लाल

PAGE NO.:
DATE

Smt. V.D. Sr. College Daulatnagar (Marali)

# बाळासाहेब देसाई फाँडेशन संचालित

श्रीमती विजयादेवी देसाई सिनिअर कॉलेज,
दौलतनगर, मरळी. ता. पाटण, जि. सातारा

[redacted] Group Project

सन - 2022 - 2023

विद्यार्थ्याचे नाव : सुर्यवंशी प्रतिमा पांडुरंग

PRN NO : 2020056988 सिट नं. : 46459

वर्ग : B.A. III (C.B.C.S.) Marathi

विषय : मराठी XIV

घटक : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

दिनांक : 28/5/2023

मार्गदर्शकाचे नाव : कांबळे व्हि. एन.

subject teacher sing :

student sing. : [signature]

# निवडक शब्दांचा संग्रह वर्गीकरण, विश्लेषण

## बखर –: वर्गीकरण

अगदी इंग्रजी आमदानीतही काही पौराणिक, मिशनरी चळवळी विषयक आणि ऐतिहासिक बखरी लिहिल्या आहेत. या सर्वांचा विचार करत असताना काल व रचनेच्या दृष्टीने 'महिकावतीची बखर' ही सर्वात जुनी बखर असल्याचे सर्वमान्य झाले आहे. या बखरींचा अभ्यास करताना त्यांचे स्वरूप विशेषांनुसार वर्गीकरण करणे महत्त्वाचे वाटते. म्हणून स्थूलमानाने बखरींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

१) समकालीन बखरनवीसांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या, ऐकलेल्या राजकीय घटनांवर आधारलेल्या बखरी- या बखरी बऱ्याचदा ऐतिहासिक दृष्टिने विश्वासनीय असतात. या प्रकारातील बखरींची संख्या मोजकीच असली तरी त्यांची विश्वासनीयता अत्यंत महत्त्वाचे व उच्च दर्जाचे आहे.
उदा. 'सभासदाची बखर' 'भाऊसाहेबांची बखर' इ.

२) आठवणी, दंतकथा, आख्यायिका, पारंपरिक हकिकती यांच्या आधारे रचलेल्या बखरी- अशा बखरी या स्मृतीवर हवाला ठेवून लिहिलेल्या दिसतात. अशा बखरी उत्तरकालीन असल्या जे पुरावे उपलब्ध होते त्यांच्या आधारे छाननी करण्यास व त्याची कथनपद्धती अधिक आकर्षक व कृत्रिमक करण्यास बखरकाराला यामध्ये संधी उपलब्ध असते. या प्रकारातील बखरीमध्ये स्थल, काल व्यक्ति विपर्यासाची दाट शक्यता असल्याने त्या बखरी विश्वसनीय मानल्या जात नाहीत
उदा. कृ. वि. ओहनी विरचित पेशव्यांची बखर दामाज्यांची हकिकत इ.

३) ऐतिहासिक कागदपत्र, जुने ग्रंथ, दफ्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहिलेल्या बखरी – या प्रकारातील बखरी या कागदपत्रांच्या आधारे लिहिलेल्या असल्या व त्या उत्तरकालीन असल्या तरी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारामुळे त्या अधिक

विश्वसनीय मानता येतात.
उदा. मल्हार रामराव चिटणीसांची बखर, सप्त प्रकरणात्मक चरित्र इत्यादींचा समावेश होतो.

४) बखर सदृश्य ऐतिहासिक लेखन - या प्रकाशातील बखरी वाका, कैफियत, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी स्वरूपाच्या लेखनांचा समावेश होतो.
उदा. पटवर्धनीय वाका, आंग्र्याची हकिकत, भाऊसाहेबांची कैफियत इत्यादी. पहिल्या वर्गातील बखरीत आढळून येणारे ऐतिहासिक प्रामाण्य या प्रकाशातील बखरींमध्ये सुद्धा पाहावयास मिळते.

५) ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या पण बखर हे नाव असलेल्या बखरी - या बखरी मुख्यत: संप्रदायिक व पौराणिक स्वरूपाच्या असतात. अशा लेखनावर लोकांची श्रद्धा असल्यानेच या श्रद्धेपोटी अशा लेखनाला बखर म्हटले जाते.
उदा. 'बकासुराची बखर, श्री कृष्णजन्मकथा बखर, श्रीसमर्थांची बखर' यांचा समावेश होतो.

## विश्लेषण

वरील पाच प्रकाशातील गद्यमय असलेले बखर लेखन पाहता 'महिकावतीची बखर' ही त्यास अपवाद म्हणून सांगता येईल. कारण की गद्य-पद्यमिश्रित प्रकारची बखर असून ती मध्ये पद्यात्मक मजकूर अधिक आहे. या बखरी कोणाच्या तरी आश्रयेवरून लिहिल्या आहेत. विशेषत: तत्कालीन राजकीय स्त्री पुरुषांच्या आश्रयेवरून बखरींचे लेखन झाल्याचे दिसते. बखरकार हे बहुतांशी राजदरबारात आश्रित होते. त्यांच्यावर बखर लेखनाची जबाबदारी सोपवून हे लेखन करून घेतले आहे. त्यामुळे बखरींचे वाङ्मयीन स्वरूप सर्वार्थाने वेगळे आहे. त्यामुळे अशा लेखनाची शुरुवात पुराण लेखनासारखी असते. व शेवटी फलश्रुती सांगितली जाते. यातूनच बखरींची निर्मिती होताना दिसते.

# लावणी -:

## वर्गीकरण

सामान्यत: ढोलकी आणि तुणतुणे या वाद्यांच्या सहाय्याने लोकांच्या रंजनासाठी गायिल्या किंवा म्हटल्या जाणाऱ्या रचनेला लावणी असे म्हणतात. या लावण्यांचा हेतू प्रामुख्याने लोकांचे रंजन करणे हाच आहे. आणि रंजन करता करता लोकशिक्षण करता आले तर, तसाही त्यांचा प्रयत्न दिसतो. तमाशाचे आज जे रूप दिसते ते रूप तमाशाला उत्तर पेशवाईत प्राप्त झालेले आ

लावणीच्या एकूण स्वरूपाचा विचार केल्यानंतर थोडक्या लावण्यांचे विषयानुसार वर्गीकरण कसे केले आहे, याचा विचार आपण करूया

विषयानुसार लावणीचे स्थूल तीन प्रकार पडतात.

१) आध्यात्मिक भेदिक लावणी
२) शृंगारिक लावणी
३) विविध विषयपर लावणी

• आध्यात्मिक लावणी - पंथ प्रसारासाठी निर्माण झालेले वाङ्मय, संतसाहित्यातील विशेषत: स्फुट काव्य या प्रकारच्या काव्यातून आध्यात्मिक लावणीचा प्रवाह निर्माण झालेला दिसतो. सामान्य जीवन जगत असलेल्या सामान्य माणसांसमोर आदर्श जीवन, विश्वाचा खरा अर्थ, ज्ञान, भक्ती हे सारे उभे करण्यासाठी या प्रकारच्या लावण्यांची रचना झालेली आहे. या प्रकारच्या लावण्या ज्यांनी रचल्या त्यात ज्योतीराम मध्यनाथ, महिपती यांचा समावेश होतो. आणि हे लोक आध्यात्मिक विचारांनी आणि अनुभवांनी प्रेरित झालेले दिसतात.

• भेदिक लावण्या - भेदिक लावण्यांतही आध्यात्मिक विषयच असतात. त्यामुळे आध्यात्मिक लावण्यांत त्यांचा समावेश झाला तरी त्या दोन्हींत थोडा फरक आहे.

गुरूशिष्य संवाद, विविध प्रश्नोत्तरे, प्रश्नांची उत्तरे देताना उखाणे वजा रचना अशा प्रकारच्या रचनेला कूटात्मक रचना म्हणता येईल. तर रामायण, महाभारत यातील प्रसंगवर कूट प्रश्न आणि त्यांची अपेक्षित उत्तरे अशा स्वरूपाच्या

ओवण्या लौकिक कूट ओवण्या म्हणता येतील. पृथ्वीचे वजन, घरबांधणी किंवा पाऊस अशी लौकिक व्यवहार - संबंधीची प्रश्नोत्तरे लौकिक कूट या प्रकारच्या ओवणीत येत

शृंगारिक ओवण्यामध्येही दोन प्रकार आहेत. संभोग शृंगार आणि विप्रयंभ शृंगार. काही लोकगीते कृषिगीते आणि काही कथनात्मक रचना यांतून संभोग शृंगार व विप्रयंभ शृंगार आलेला दिसतो.

लौकिक संभोग शृंगारपर ओवण्यातून सौंदर्यवतीचा साजशृंगार, पत्नीची संभोगउत्सुकता, प्रियकराला विनवणाऱ्या प्रेयसीच्या भावना असे प्रियकर-प्रेयसीच्या भावविश्वातील कितीतरी विषय या प्रकारच्या ओवणीतून प्रगट होताना दिसतात.

लौकिक विप्रयंभ शृंगारपर ओवण्यांतून ऐतिहासिक काळामध्ये स्वारीवर गेलेल्या किंवा मुशाफिरीसाठी परदेशात गेलेल्या, विरहात असणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या भावभावनांचे चित्रण या ओवण्यांतून चित्रित होताना दिसतात.

**विश्लेषण** -: ओवणी वाङ्मयाच्या प्रेरणा, स्वरूप आ विकास जर समजून घ्यावयाचा असेल तर पेशव्यांच्या काळातल्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आधी विचार करावा लागेल हे सिद्ध होते. ओवणीचा जन्म आणि विकास त्यातून व्यक्त होणारे सामाजिक जीवन, ओवणीच्या व्युत्पत्तिविषयीची अनेक मते, त्यातील विषयांची विविधता, या सर्वांचा लपशील पणे अभ्यास केलेला दिसतो. आणि त्याचबरोबर शाहीर आणि प्रत्येकाच्या ओवणीचा स्वतंत्र अविष्कार आणि वैशिष्ट्ये यांचेही संदर्भ योग्यरित्या मांडले गेलेले दिसते. अशाप्रकारे ओवणीत केवळ शृंगारिक आणि आध्यात्मिक विषय आलेले नाहीत तर काही उपदेशपर, वैराग्यपर लौकिक, देवतावर्णनपर, कथनपर, गुरुमाहात्म्य व संतमाहात्म्यपर, व्यक्तिवर्णनपर, विनोदपर अशा विविध स्वरूपात विषयांना ओवणीत स्थान मिळालेले दिसते.

Smt. V.D. Sr. College Daulatnagar (Marathi)
PAGE NO.:
DATE: / /

# शिवलीलामृत :-

## वर्गीकरण

शिवमंत्र सामर्थ्यावर पापमुक्त झालेल्या दाशार्ह राजाची कथा, शिवरात्री माहात्म्य अशा कथांचा समावेश असणाऱ्या या ग्रंथाची रचना इ.स. १७१८ मध्ये श्रीधरांनी केली. २२६० ओव्यांमध्ये स्कंदपुराण्यावर आधारीत शिवभक्ती पर कथा आहे. 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र दारिद्र्य, दुःख शोक यांचा संहारक असून मानवास तारक आहे, असे इथे सांगितले आहे. यातील अध्याय मुळात चौदा आहेत पंधरावा अध्याय श्रीधर भक्ताने जोडला असावा. श्रीधरांकडे अत्यंत अलौकिक प्रतिभा नव्हती. पण विविध प्रसंगांची व भावनांची चित्रे त्यांनी चांगलीच रंगवली. 'आत्मप्राप्तीवीण साधन। जसे अलंकार गळसरीविण। की दीपाविण शून्य सदन। जीवनेंवीण सरिता जैसी॥' असा उपमा-दृष्टांतांचा सहजपणा त्यांच्या भाषेत आहे. एकनाथांच्या वृत्तीतील प्रेमळपणा व वाणीतील सोज्वळपणा हे विशेष श्रीधरीग्रंथात सहज रम्यतेने प्रकटतात. गंगौघासम शांत संघ कथाप्रवाह व शुद्ध भावमयता यांमुळे सांसारिकांना हे श्रीधरी ग्रंथ संजीवक वाटतात. भाविकता व प्रेमळपणा हा त्यांच्या वृत्तीचा विशेष असल्याने त्यांची वाणी विलक्षण गोड झाली आहे. संसारश्रांतांना आपली दुखे विसरायला लावणे हेच श्रीधरांच्या ग्रंथांचे उद्दिष्ट असून तीच त्या ग्रंथाची फलश्रुती होय. स्कंदपुराणाचा आधार घेऊन श्रीधरांनी हा ग्रंथ रचला. शिवमंत्रावरील श्रद्धा व श्रीधरांची लोकमनाची पकड घेणारी ओघवती निवेदनशैली. यांमुळे या ग्रंथाची लोकप्रियता आजही टिकून आहे. एकंदरीत श्रीधरांचे ग्रंथ त्यांच्या ह्यातीतच गावोगावी पोहोचले होते घरोघरी पूर्वी आणि आजही त्यांची पारायणे झाली व होत आहेत. या ग्रंथाच्या श्रवण पठणाने पातके नष्ट होतील. अपार आयुष्य, आरोग्य, संतती व संपत्ती मिळेल असे तो म्हणतो. तसेच 'ॐ ॐ नमः शिवाय' हा मंत्र दुःख, भय, शोक, काम, क्रोध यांचा संहारक व मानव जातीसाठी तारक

असल्याची ग्वाही कवी देतो. कवीची शिवमंतावरील श्रद्धा, लोक माणसांच्या मनाचा ठाव घेणारी भाषा यामुळे हा ग्रंथ आजही लोकप्रिय आहे.

**विश्लेषण -:** श्रीधरानी श्रीपंढरीमहात्म्य, श्रीज्ञानेश्वरीचरित्र, वेदांतसूर्य असे ग्रंथ लिहल्येले दिसतात. व साधी सरळ, प्रसन्न नीतीबोध शिकवणारी व संसारिक दुःखे विसरायला लावणारी त्यांची कविता आहे. जनमानसावर पकड देवण्याचे सामर्थ्य निश्चितच त्यांच्यात आहे. असे दिसते.

## वैशिष्ट्य -:

### वर्गीकरण

इ.स. १३१६ (श. १२३८) काव्यक्रमानुसार 'उद्धवगीते नंतर वैशाहरणाचा नियम लागतो या ग्रंथाचे लेखक दामोदर पंडित हे होत भास्करभट्ट आणि नरेंद्र यांच्या पेक्षा दामोदर पंडित मात्तावर होता. तो अतिशय पंथनिष्ठही होता. पण त्यांच्या पेक्षा त्यांची पत्नी हिराईसा उर्फ हिरांबीका ही त्यांच्या हुन अधिक पंथनिवृत्त होती. यातील ~~दुःख~~ वर्णनाचा दुःख वर्णनाचा मिळालेले असल्यामुळे त्या वर्णनात भावस्निग्धता यायला हवी. तिने नवसाच्या आधीच पंथ प्रवेश केला, भिक्षा घेतली पण संसाराच्या आकर्षक पोटी मुलाचे लग्न होईपर्यंत भिक्षा करू नये असे दामोदर पंडितास वाटत होते. पत्नीने त्यासाठी परवानगी दिली. पण मुलाचे लग्न झाल्यानंतर ही पंडिताचे मन संसारातून मुक्त होईना तेव्हा चिडून जाऊन हिराईसा नवऱ्याला म्हणाली 'जिथे चुलिची खीर खाल्ली; तिथे चुलीची काय राख खाल्ली' या शब्दांनी दामोदर पंडित खडबडून जागा झाला. आणि त्यांनी

वल्लाहरण रचना दामोदर पंडितांनी इ.स. 1616 मध्ये केली. भागवताच्या दशमस्कंधातील 12, 13 व 17 वा अध्यायात आधारभुद वद्य व वल्लाहरणाची कथा आली आहे. या कथेच्या आधारे दामोदर पंडिताने 503 ओव्यांचे काव्य लिहले.

**विश्लेषण** -: वरील वाङमय निर्मितीचा विचार केल्या नंतर ज्ञानदेवांच्या कृतीची आणि वाङमयाची आपणास कल्पना येवु शकेल. ज्ञानेश्वरांनी आपल्या कथेतुन आणि वाङमयातून सामान्य माणसांसाठी मोक्ष प्राप्तीचे दरवाजे खुले केले. धर्म मुठभर लोकांचा नसतो. तो सर्वांसाठी असतो. हे दाखवून दिले. भक्तीची आणि मोक्षाची वाट कोणाही चालवू शकतो. असे त्यांना वाटत होते मात्र त्यांनी कधी संन्यासाच्या विरक्तीचा संवाद केला नाही.

PAGE NO.
DATE

Smt. V.D.Sr.College Daulatnagar(Marali)

# बाळासाहेब देसाई फाँडेशन संचालित

## श्रीमती विजयादेवी देसाई सिनिअर कॉलेज, दौलतनगर, मरळी ता. पाटण, जि. सातारा

[redacted] Group Project

सन - 2022-2023

विद्यार्थ्याचे नाव : सुर्यवंशी प्रतिमा पांडुरंग

PRN NO : 2020056988 सिट नं. : 46459

वर्ग : B.A III (C.B.C.S) Marathi

विषय : मराठी XV

घटक : मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी

दिनांक : 28/5/2023

मार्गदर्शकाचे नाव : कांबळे व्हि. एन

subject teacher sing -

student sing - [signature]

# आकाशवाणीसाठी संहिता लेखन

PAGE NO.
DATE / /

## * आकाशवाणीसाठी संहिता लेखन *

आकाशवाणी हे श्राव्य माध्यम असल्याने त्यामध्ये श्रोता हा फक्त ऐकू शकतो. ज्यावेळी आपण आकाशवाणीविरीत्य कार्यक्रमांचा विचार करतो त्यावेळी आपले लक्ष फक्त आवाजावर जाते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आवाजाचे महत्त्व फार मोठे आहे. आकाशवाणीसाठी कार्यक्रम तयार करण्यासाठी आवाजाबरोबरच संगीत, ध्वनी प्रभावी असावे लागते. पण तत्पूर्वी त्या कार्यक्रमाची संहिता महत्त्वाची असते. म्हणून आकाशवाणीसाठी संहितालेखन-कौशल्य विहिताना पुढील गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेतल्या जातात.

**१) आकाशवाणी एक जनमाध्यम –:** आकाशवाणी हे एक जन-माध्यम असल्यामुळे आपण एकाचवेळी खूप मोठ्या जनसमुदायापर्यंत पोहचू शकतो. आपण मुलाखती दरम्यान अथवा अन्य कार्यक्रमादरम्यान एकाच व्यक्तीशी बोलत असलो तरी आपण हजारो लोकांना माहिती देत असतो. त्यामुळे दिला जाणारा संदेश हा व्यावसायिक, स्पष्ट आणि परिणामकारक असावा. आकाशवाणीसाठी केले जाणारे लेखन हे कौशल्यपूर्ण असावे. त्यातून समाजाचे प्रबोधन आणि विकास व्हावा. उगीच शब्द वाढवण्यासाठी पाल्हाळ लावू नये.

**२) संहितेतून चित्र तयार करणे –:** आकाशवाणी हे फक्त श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीविरीत्य कार्यक्रम कानांनी ऐकून त्याचे एक चित्र मनात उभे करावे लागते. त्यामुळे संहितालेखकाने आपल्या प्रतिभाशक्तीच्या व कल्पनाशक्तीच्या जोरावर शब्दांच्या योग्य मांडणीतून श्रोत्यांसमोर जिवंत चित्र उभे करावे. त्यासाठी संहितालेखकाने शब्दांचा उचित वापर करावा. योग्य ठिकाणी अलंकार वापरा. संहिता ही भावनांचे संगोपन करणारी असावी. त्यातून श्रोत्यांसमोर योग्य चित्र उभारता आले पाहिजे.

**३) स्वसंहिता ऐका –:** संहिता लेखकाने संहितेमधून श्रोतृ वर्गास जो संदेश द्यावयाचा आहे तो स्वत: लेखन पूर्ण झाल्यावर वाचून पहावा. असे वाचन केल्या आपण काय लिहिले आहे याबाबत नेमकी जाणीव होते.

८) लेखकास संहितेमधून नेमके काय सांगायचे आहे
करावे.
५) लेखकाने त्याचे लिहावयाचे मुद्दे योग्य क्रमाने मांड
त्यानंतर लेखन करावे.
६) कोणत्याही संहितेची सुरुवात ही मनोरंजक आणि
पूर्वक असावी
७) लेखकाने श्रोतृवर्गाशी डोळ्यांसमोर ठेवून लेखन करा
८) लेखकाने त्याच्या लेखनात सामान्य जनांची भाषा
संहितालेखनात छोट्या छोट्या वाक्यांचा वापर करावा
९) संहितालेखन हे प्रभावित करण्यासाठी नसून ते श्रोत्यां
समजण्यासाठी असते. याचे भान ठेवावे.
१०) संहितालेखनामध्ये भाषा, व्याकरण आणि विरामचि
यांचा सयुक्तिक वापर करावा.
११) जसे आपण बोलतो त्याप्रमाणे लिहावे.
१२) जर एखाद्या संहितालेखनामध्ये अंकांची मोजणी करा
असेल किंवा आकड्यांच्या स्वरूपात माहिती द्यावयाची
असेल तर ती क्लिष्ट न देता सोप्या रूपात द्यावी.
१५ कोटी ८७ लाख ९८ हजार २२२ ऐवजी सुमारे
असे म्हणावे.
१३) सर्वनामांचा वापर शक्यतो टाळावा.
१४) नावांच्या अगोदर त्यांच्या उपाध्या लावावयात उ
उदा. शरद पवार मुख्यमंत्री न म्हणता मुख्यमंत्री
पवार असे म्हणावे.

## * आकाशवाणीवरील वेगवेगळ्या स्तरातील लोकांसाठीचे

संवादात्मक कार्यक्रम हा रेडिओवरील कार्यक्रमाचा
आहे. यामध्ये निवेदक व त्याचे निवेदन हे मुख्य भाग
या कार्यक्रमामध्ये निवेदक हा विशिष्ट कालावधीमध्ये
म्हणजे सादर करतो. मुख्यत: एखाद्या विशिष्ट विषया
तज्ज्ञांकडे ते दिले जाते.
१) शैक्षणिक कार्यक्रम :- आकाशवाणी जनसामान्यां
माध्यम आहे. समाजातील

वेगवेगळ्या वर्गातील लोकांसाठी कार्यक्रम करणे हे आकाशवाणीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. यामध्ये शेतकरी वर्गासाठी कार्यक्रम करणे ही अत्यावश्यक गोष्ट आहे. हवामानाचा अंदाज, हंगामानुसार पीक, शेत आणि किडीचे व्यवस्थापन, पशुपालन, सरकारी योजना या आणि अशा अनेक विषयांवर आधारित कार्यक्रम केले जातात. यांची संहिता ही त्या त्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने लिहिली जाते. समजा 'औषध फवारताना घ्यावयाची काळजी' या गंभीर विषयाची माहिती सर्वसामान्य शेतकऱ्यांना बोली भाषेतून समजेल अशी संहितेची मांडणी करण्याची गरज असते

**औषध फवारणी करताना घ्यावयाची काळजी**

आबा - आक्का, हाय्सा का घशत.
आक्का - हाय की वो. काय झालं ? काय म्हणताय ?
आबा - काय नाय वो, तुम्हासनी माहिती हाय का, वरच्या आळीचा सर्जा वावशत फवारणी करीत हुता तवा त्याला विषबाधा झाली ते
आक्का - कवा वो ते आणि कसं बर झालंवो.
आबा - आज सकाळी सकाळी झालं.
आक्का - कस काय वो आबा झालंय बे.
आबा - अग आक्के, औषिद मारताना काळजी नसंल्य होतली त्यानं
आक्का - त्यात आणि कसली काळजी घ्यायची हाय.
आबा - अग आक्के, ते कुठल्यातरी जाणकाराला इचारून होतलं पाहिजे बघ.
आक्का - आता ह्यो नाणकार आणि कोण भेटायचा आबा
रमेश - काय आबा ? काय चालंलंय कसला विषय चालू आहे. कोण जाणकार हवा आहे तुम्हाला ?
आबा - टायमात आलास बघ रमेश. तुला माहिती हाय नव्हं ! वरच्या आळीच्या सर्जाला वावरात फवारणी करताना ? आरं पन काय आणि कशी घ्यायची ते कसं कळणार रं आपल्याला ते ?
रमेश - आबा, फार काही अवघड नसतं पण काळजी घेणं गरजेचं असतं बघ

आवका -: आरं पण काय काळजी घ्यायची ते तरी सांग.
रमेश -: आवका पहिली गोष्ट म्हणजे औषध किती प्रभावी आहे याची माहिती असण गरजेच आहे.
आबा -: ह्य बरोबर आहे बघ.
आवका -: आणि फवारणी करताना काय काळजी घ्यायची
रमेश -: आवका, लक्षात ठेव. पहिलं औषधाचं मिश्रण वि प्रमाणात करायचं आहे हे माहित पाहिजे. त्यानंत औषध मारताना शरीर व्यवस्थित झाकलं जाईल थाकडे लक्ष द्यावं. शक्यतो नाक, तोंड पूर्ण झाकल याची काळजी घ्यावी.
आबा - आक्शी बरोबर बोलल्यास बघ बाबा.
रमेश - एवढंच नाही आबा तर औषध मारताना काहीही प्याचं नाही.
आवका -: म्हणजे तोंडावाटे विष पोटात जाणार नाही.
रमेश -: औषध मारून झाल्यावर बी काळजी घ्यावी ल हात, पाय बी स्वच्छ धुऊन घ्यावे लागतात.
आबा आणि आवका -: ह्य रं त्येकरा, चांगली माहिती द बघ. यापुढं आपलं शेतकरी बांधव होतील बघ.

* ४) महिलांविषयक कार्यक्रम

महिलांविषयक कार्यक्रम करताना महिलांविष हक्क, अधिकार, त्यांना मिळणाऱ्या सुविधा, त्यांच्याशी असणारे विषय जसे की, वेगवेगळ्या पदार्थांच्या पाक बालसंगोपन, आरोग्यविषयक, कलाकुसर, बालसंस्का पर्यटन, कर्तबगार महिलांच्या मुलाखती इत्यादींचा विचार होतो. व त्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम केले त्यासाठीच्या संहिता विषयानुरूप तसेच कार्यक्रमानु ठरवित्या जातात.
मैत्रिणींनो, महिलाजगत या कार्यक्रमात स हर्ष स्वागत. आज शुक्रवार, आपल्या कार्यक्रमामध्

आपल्याला तक्रार आली आहे ठाण्याहून. आपली मैत्रीण सुवर्णा दांडेल हिने आपल्या पत्रामध्ये म्हटलं की, हिच्या भागात ॲनेमिया या रोगामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढलं आहे. तर नेमकं काय करावं.

मैत्रिणींनो २०१८ च्या आकडेवारीनुसार ॲनेमिया या रोगापासून ५० टक्क्यांहून अधिक स्त्रिया या बाधित आहेत. हा रोग नेमका काय आहे. हे जाणून घेण्यासाठी आणि सुवर्णा दांडेल यांच्या समस्येचे उत्तर देण्यासाठी आपल्या सोबत आहेत डॉ. प्रेमला पाटील.

निवेदिका –: नमस्कार मॅडम, आपले कार्यक्रमात स्वागत आहे.

डॉक्टर –: नमस्कार

निवेदिका –: मॅडम आपण पाहतो आहे. सध्या ॲनेमियामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढले आहे. तर नेमकं हे ॲनेमिया आहे काय?

डॉक्टर –: ॲनेमिया म्हणजे थोडक्यात सांगायचे झाले तर रक्तक्षय किंवा पंडुरोग. हा रोग होण्याचे मुख्य कारण म्हणजे थोडक्यात सांगायचे झालं तर लाल रक्तपेशींची संख्या कमी होणे किंवा हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे हे आहे. यामुळे रक्तामध्ये लोहाची कमतरता होते.

निवेदिका –: मॅडम याची लक्षणे कोणती?

डॉक्टर –: याची प्रमुख लक्षणे अशक्तपणा, अस्वस्थपणा, चक्कर येणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होणे.

निवेदिता –: याच्यावर उपचार कोणते?

डॉक्टर –: याच्यावर उपचारासाठी जीवनसत्व बी १२, फॉलिक ॲसिड, जीवनसत्व सी असणारी फळे जसे लिंबू, संत्री, आंबे इ. राजगिरा, गूळ शेंगदाणे, बदाम, हिरव्या पालेभाज्या, खजूर, अंडी, मांस, मासे इ.

निवेदिता –: हा रोग होऊ नये म्हणून आपली जीवनशैली कशी असावी?

डॉक्टर –: दररोज व्यायाम हा अनिवार्य आहे. वेळच्या वेळी नाष्टा व जेवण घेतलेच पाहिजे. व्यसन टाळावे. थोडसमृद्ध आहार घ्यावा. पुरेशी झोप घेणंही

निवेदिका –: डॉक्टर मॅडम, आपण इथे आलात व आ
मैत्रिणींना ॲनेमिया विषय मार्गदर्शन के
याबद्दल धन्यवाद.

डॉक्टर – : धन्यवाद.

निवेदिता –: मैत्रिणींनो, तुम्हीही तुमची काळजी घ्या व
अनेमिया या रोगापासून डॉक्टर मॅडमनी
सांगितल्याप्रमाणे काळजी घेऊन स्वतःच
करा. आता जाता जाता तुमच्यासाठी हे
---

आजचा कार्यक्रम आपण इथेच थांबवूया तर निवे
---हिता निरोप द्या धन्यवाद.

या प्रकारे महिलाविषयक कार्यक्रमात कार्यक्रमाचे संहि
केले जाते.

## ३) शैक्षणिक कार्यक्रम

विद्यार्थी व तरुणाई ही भारताची सर्वात मोठी ता
आहे. या शक्ती विधायकरीतीने वापरण्यासाठी आणि त
विद्यार्थी व वर्गाचे भविष्य उज्ज्वल करून एक सक्षम
निर्मितीसाठी आकाशवाणीचा प्रभावी माध्यम म्हणून वापर
जातो. या प्रकारच्या कार्यक्रमामध्ये तरुण आणि विद्या
वर्गाच्या समस्या त्यांच्या शिक्षण पद्धती, अर्थार्जनाच्या
करिअरच्या संधी, महागाई, बेरोजगारी इत्यादी विषय
मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करू शकतो.

आज भारतात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोह
माध्यम म्हणजे आकाशवाणी. आकाशवाणीची ४५० केंद्रे, २
१४६ बोली भाषा, ९९% क्षेत्रफळ ९९.१९% लोकांपर्यंत
पोहचण्याची क्षमता आहे. पण आपल्या देशातील विद्या
संख्या मर्यादित आहे. यामुळे आकाशवाणी हे एक लोकप्रि
माध्यम बनले आहे. आकाशवाणीवरून शालेय व उच्चश
तील अभ्यासक्रमावर आधारित कार्यक्रम प्रसारित केले ज

PAGE NO.:
DATE: / /

शैक्षणिक कार्यक्रम लिहीत असताना ध्यावयाची काळजी

१) ज्या विद्यार्थांसाठी कार्यक्रम तयार करावयाचा आहे, त्यांचा वयोगट, अकल्पनक्षमता, वर्ग बौद्धिक स्तर वगैरे लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यक्रमाचे संहितालेखन करावे.
२) आपण कोणत्या कौशल्यावर आधारित शिक्षण देणार आहोत ते निश्चित करून त्यावर आधारित संहितेचे लिखाण करावे.
३) कार्यक्रमाचे स्वरूप काय असावे ते कार्यक्रमाच्या संहितेतच स्पष्ट करावे. उदा- मुलाखत, रूपक, नभोनाट्य इ.
४) संहितेची वेळ निश्चित करून लिहित वेळेत ती पूर्ण करावी विनाकारण लांबवू नये.
५) विद्यार्थ्यांची आवड आणि संपादन क्षमता ध्यानात घेऊन संहिता लिहावी.

उदा. संहितेचा नमुना

श्रोतेहो नमस्कार, हे आकाशवाणीचे कोल्हापूर केंद्र आहे. सकाळचे ठीक नऊ वाजले आहेत. आता वेळ झाली आहे ज्ञानवाणी या कार्यक्रमाची. मितहो गेल्या आठवड्यात महाराष्ट्राच्या प्राकृतिक भूभागांची माहिती आपण संवादातून घेतली. आज सुमित आणि अमित काय जाणून घेतात ते आपण ऐकू या-

सुमित –: ए अमित, आपली वारणा नदी आहे ना ती दक्षिणेकडे वाहते.

अमित –: नाय रे ! ती पूर्वेकडे वाहत जाऊन पहिली कृष्णा नदीला मिळून नंतर बंगालच्या उपसागराला मिळते.

सुमित –: तू तर लय हुशार झालास की.

अमित –: नाय रं बाबा, आमच्या दादा स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करतोय, त्यानं मला समजून सांगितलं तेव्हा मला कळलं

सुमित –: भारी हाय की, आपल्या भूगोलाच्या पुस्तकातील माझ्या डोक्यात काहीच शिरत नाही बघ. चल तुझ्या दादाला जरा विचारूया.

अमित –: लय चल जाऊया

दादा –: (दरडावून काय रे पोरांनो) माझ्याकडे काय काम

PAGE NO.:
DATE / /

अमित -: काय नाय रे दादा, तुझ्याकडे सहजच आलो होतो
सुमित -: नाय रे दादा, ह्योच मला तुझ्याकडे घेऊन आल
अमित -: मी नाय रे, दादा ह्योच मला म्हणाला, दादाकडून
महाराष्ट्राची नदीप्रणाली समजून घेऊया.
दादा -: (हसत हसत) एवढंच होय, सांगतो की मग.
अमित -: वारणा नदी कृष्णेची उपनदी होय का नाय दादा
सुमित -: दादा, आरं ह्यो मगापासून वारणा कृष्णेतच अड
पडलाय, मला महाराष्ट्रातील सगळी नदीप्रणाली
समजून घ्यायची आहे.
दादा -: हे बघा पोरांनो, आपल्या महाराष्ट्रात पूर्ववाहिनी
पश्चिमवाहिनी अशा दोन प्रकारच्या नद्या आहेत
सुमित -: म्हणजे
दादा -: हे बघ सुमित, आपल्या महाराष्ट्रातील पश्चिमव
नद्यांचा द्रुभाजक आहे. यामध्ये पश्चिमेस वाहत
अरबी समुद्रास मिळणाऱ्या पश्चिमवाहिनी नद्य
ताप्ती नर्मदा आणि कोकणातील उल्हास, वैतरणा,
दमणगंगा, तेरेखोल इत्यादींचा समावेश होतो.
तर पूर्वेस वाहत जाऊन बंगालच्या उपसागरास मि
पूर्ववाहिनी नद्या म्हणजे गोदावरी कृष्णा, प्राणहित
पैनगंगा इत्यादी आहेत.
अमित -: समजलं का सुमित ?
सुमित -: ह्ये समजलं की, दादा महाराष्ट्रातील सगळ्या
मोठी नदी कोणती रे ?
दादा -: अरे गोदावरी नदी सगळ्यात मोठी नदी आहे.
तिची लांबी १४५० किमी असून महाराष्ट्रात ६६
वाहते आणि पुढे जाऊन ती आंध्रप्रदेशातील राज
था ठिकाणी बंगालच्या उपसागरास मिळते.
अमित -: बघ सुमित दादा कसली भारी माहिती देतोय.
सुमित -: ह्ये भाईनं मला दुकानाला जायला सांगितलं
आता मी निघतो. नाहीतर मला आईचा मार ख
लागेल.
अमित -: दादा थँक यू.
दादा -: ए अभ्यास कर रे पोरांनो आणि काही शंका असल्य

मला विचारत जा. तेवढीच माझी उजळणी
याप्रमाणे सदरच्या कार्यक्रमांच्या सरळ, साध्या, सोप्या
अर्थपूर्ण, भाषेत संहिता लिहाव्यात.

# * चित्रवाणी संहिता लेखन *

## * चित्रवाणी संहिता लेखन -:

समाजमाध्यमांच्या उदयानंतर सर्वाधिक वेगाने माहि
पुरवणारे माध्यम म्हणून ते पुढे आले. परंतु असे असले तरी
दूरचित्रवाणीचे आजही महत्त्व आहे. जागतिक घडामोडी तुमच्य
दिवाणखान्यात पोहचवण्याचे काम चित्रवाणीच्या माध्यमातून हो
विविध मराठी हिंदी वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून केवळ रिमोटचे
एक बटन दाबत तुम्ही जगभरातील घडामोडी जाणून घेऊ शक
या क्षेत्राची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. अने
या क्षेत्रात आपले करिअर करण्याची इच्छा आहे. वाढत चाल्यल
वृत्तपत्रविद्या विभागाची संख्या त्याचेच प्रतिक आहे. सर्वसाधा
चित्रवाणी म्हटले की निवेदक, वार्ताहर आणि कॅमेरामन अर्थात
छायाचित्रकार हे तीनच घटक समोर येतात. पण चित्रवाणीच्या
माध्यमातून तुमच्यापुढे बातमी सादर करण्यामागे अनेक हा
असतात. आणि त्यातच अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध अ
चित्रवाणीचा विचार केला तर निवेदक/सूत्रधार, ॲनिमेटर
ऑडिओ इंजिनिअर, कॅमेरामन, क्रिएटिव्ह डायरेक्टर, व्हिडिओ
एडिअ एडिटर, ॲनिमेशन प्रमोटर, प्रोड्युसर, प्रोग्राम डेव्हल
साऊंड मेन, स्पेशल इफेक्ट एडिटर, टी.व्ही. न्यूज रिपोर्टर
टेक्निकल वर्कर इत्यादींची आवश्यकता असते.

चित्रवाणीकडे आजही सर्वाधिक परिणामकारक म्ह
पाहिले जाते. त्यामुळे दूरचित्रवाणीमध्ये दर्जेदार सादरीकर
खूप महत्त्व आहे. या सादरीकरणात भाषेला अनन्यसाधार
महत्त्व आहे. मुद्रित माध्यमामध्ये वापरली जाणारी भाषा
प्रमाणलेखनाचा अनुसरण असते. दूरचित्रवाणीमध्ये मात्र

प्रमाणभाषेपेक्षा बोलीभाषेकडे झुकणारी, म्हणजेच ऐकण्
क्षमतेचा विचार करून वापरलेली असते. मुद्रित माध्य
आलंकारिक भाषा वापराव्या लागतात. चित्रवाणीम
अशी भाषा वापरली तर निवेदकाला संवाद साधताना
अडचण येऊ शकतेच परंतु प्रेक्षकाच्या समजण्यात अवघड
मुद्रित माध्यमामध्ये वाचकाला ते परत वाचण्याची संधी
मिळत असते. आणि त्यामुळे एखादा शब्द समजला नाह
तर वाचक तो परत वाचू शकतो. परंतु चित्रवाणीमध्ये
अशी भाषा वापरली तर निवेदकाला संवाद साधताना
अडचण येत नाही. चित्रवाणीमध्ये प्रेक्षकांना परत ऐकण्या
संधी नसते. त्यामुळे निवेदकाला जे सांगायचे आहे ते
अगदी स्पष्ट असावे लागते. त्यात शब्दांची गुंतागुंत
आलंकारिक शब्दप्रयोग कटाक्षाने टाळत घटना वाचण्यापेक्
ती सांगतोय याकडे लक्ष दिले पाहिजे. मुद्रित माध्यमामध्
वाक्य खूप मोठे असले तरी वाचकाला ते समजू शकते.
उदाहरणार्थ : मुद्रित माध्यमांमध्ये परीक्षेबाबत बातमी
खालील पद्धतीने लिहिली जाते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) सूचनेनं
अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची भूमिका राज्य सरक
कायम ठेवली असताना देशभरातील जवळपास ७० टक्के
विद्यापीठे परीक्षांबाबत सकारात्मक असल्याचे स्पष्ट झा
असून अनेक विद्यापीठे परीक्षेचे नियोजन करत आहेत.

पण हीच बातमी चित्रवाणीसाठी लिहायची असेल
एवढे मोठे वाक्य वाचताना निवेदकाचा दम तर लागेलच
पण प्रेक्षकांना ते समजणे अवघड होईल. ही बातमी चित्र
मध्ये लिहायची झाल्यास ह्यात वाक्ये छोटी असावी लागत

युजीसीच्या सूचनेनंतरही अंतिम वर्षाच्या परीक्ष
रद्द सरकार करण्यावर सरकार ठाम आहे. पण असं अ
तरी देशभरातलं चित्र मात्र वेगळं आहे. देशातल्या ७० ट
विद्यापीठांनी परीक्षा घेण्याची तयारी दाखवली त्यासाठी
नियोजन ही सुरू आहे.

**दृश्यिकवाणीसाठी लिहीत असताना**

१) सुरुवातीला घटना सांगावी

२) तुम्ही मोठ्या प्रेक्षकवर्गासाठी निवेदताय.
३) परत सांगण्याची संधी नाही.
४) गुंतागुंतीची वाक्य टाळणे.
५) शुद्ध परंतु साधी भाषा.
या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे...!

दूरचित्रवाणीमध्ये बातम्यांबरोबरच विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाते. त्यामुळे प्रत्येक वेळी संवादाची भाषा बदलत असते. परंतु शैली मात्र साधी, प्रवाही अशीच असते. पडदा आणि प्रेक्षक यांच्यात संवाद साधण्याचे काम निवेदक करत असतो. त्यामुळे निवेदकाला जेवढे भाषेकडे लक्ष द्यावे लागते तेवढेच त्याला इतरही गोष्टींची माहिती असावी लागते. चित्रवाणीमध्ये निवेदन करताना निवेदकाला अधिक सतर्क आणि अभ्यासू रहावे लागते. सगळ्यात महत्वाचे म्हणजे हे सादरीकरण पटकथेच्या पार्श्वभूमीवर असल्याने त्या अनुषंगाने त्याची तयारी आणि अभ्यास असावा लागतो.

* **निवेदन –:**

चित्रवाणीमध्ये वार्ताहार, व्हिडिओ एडिटर आणि बातमीवर कष्ट केलेल्या प्रत्येकाचे काम यशस्वी किंवा अयशस्वी होण्याची संपूर्ण जबाबदारी निवेदकाची/निवेदकावर असते. निवेदक सांगतोय हे जर प्रेक्षकांना खरे वाटत नसेल तर संपूर्ण कष्ट वाया जातात. अर्थात चांगले निवेदक होण्यासाठी चांगले सादरीकरण करण्याची क्षमता या बरोबरच्या अधिकार, विश्वासार्हता, चांगले दिसणे, चांगले गुण महत्त्वाचे असते. तुम्ही जी बातमी किंवा माहिती सांगताय त्यावर प्रेक्षकांचा विश्वास असणे गरजेचे असते. त्यासाठी निवेदकाला निवेदनाबरोबरच पटकथेचे ज्ञान असणे गरजेचे असते. निवेदन करताना काही चुका झाल्या की विश्वासार्हता कमी व्हायला वेळ लागत नाही. बातमी सांगत असताना निवेदकाला सादरीकरणावर विशेष लक्ष द्यावे लागते. त्याचबरोबर पडद्यावर तुम्ही कसे दिसणार याकडे लक्ष द्यावे लागते. चुकीची केशरचना, विचित्र कपडे निवेदकाने घातले तर प्रेक्षक बातम्या ऐकण्याऐवजी निवेदकाकडे अधिक लक्ष देऊ शकतात आणि बातमी हा मुख्य घटक बाजूला पडू शकतो. त्यासाठी

PAGE NO.:
DATE / /

[illegible] किंवा माहिती ही त्या पद्धतीने लिहली गेलेली असावी [illegible]

## निवेदकाचे गुण :-

**[illegible] :-** निवेदकाला निवेदन करताना ज्या [illegible] कार्यक्रम सादर केला जातोय [illegible] गरजेचे असते. त्या [illegible] त्या घटनेशी संबंधीत प्रत्येक [illegible] या सर्व गोष्टींची [illegible] त्याला असणे गरजेचे असते. हा सर्व अभ्यास सुसूत्र [illegible] प्रेक्षकांच्या आकलन क्षमतेला लक्षात घेऊन सादर करण्याचे कसब निवेदकाकडे असावे लागते.

**२) अचूकता :-** बातमी सांगणे असो किंवा एखादा माहितीपर कार्यक्रम. निवेदकाने अचूक माहिती पुरवणे अत्यंत गरजेचे असते. अर्थात निवेदकाला बऱ्याच वेळी ही माहिती किंवा बातमी त्या त्या कार्यक्रमाच्या किंवा बातमीपत्राच्या निर्मात्यांकडून दिली जाते. मात्र जर निवेदकाचा स्वतःचा अभ्यास असेल तर दिली जाणारी माहिती किती सत्य आणि किती अचूक आहे हे तो त्याच्या पातळीवर ठरवून त्याचे सादरीकरण करू शकतो.

**३) संवाद आणि भाषाकौशल्य :-** चित्रवाणीमध्ये प्रेक्षक दृश्य आणि ध्वनी या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पाहत असतो. त्यामुळे त्याला निवेदक हा त्यांच्याशी संवाद्य साधतोय असे वाटत असते. म्हणूनच निवेदकाचे संवादकौशल्य उत्तम असावे लागते. निवेदकाचा आत्मविश्वास त्याला अचूक शब्दाची जोड या सर्वांचा एकत्रित परिणाम प्रेक्षकांवर होत असतो. चुकीच्या शब्दांची [illegible] वाक्यांची निवेदकाने निवड केली तर प्रेक्षकाला ते [illegible]तही नाही आणि त्यांना निवेदक त्यांच्याशी संवाद्य [illegible] याची जाणीवही होत नाही म्हणून चित्रवाणीवर [illegible] करताना संवाद खूप महत्त्वाचा असतो.

# चित्रवाणी बातमीलेखन

चित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम असल्याने इथे शब्दांना खूप मर्यादा असतात. अपवादात्मक परिस्थिती सोडल्यास तर कोणतीही बातमी एक ते दीड मिनिटांच्या वर नसते. बातमीसाठी आवश्यक फाईव्ह डब्ल्यू आणि १ एच म्हणजे Who, What, When Where, Why हे सर्व या मिनिट दीड मिनिटात सांगणे गरजेचे असते. त्यामुळे चित्रवाणीमध्ये बातमीतील प्रत्येक शब्द निवडताना त्याची किती गरज आहे, का आहे याचा विचार करावा लागतो. चित्रवाणीमध्ये तुम्हाला दृश्य दाखवता येत असतात. त्याचा आधार घेत लेखन करावे लागते. विविध रंगांच्या गुलाबांच्या प्रदर्शनाची बातमी चित्रवाणीवर दाखवायची असेल तर हा पिवळा हा पांढरा किंवा इतर कोणत्या रंगाचा गुलाब हे सांगण्याची गरज नाही. परंतु ही बातमी दूरचित्रवाणीवर किंवा दूरचित्रवाणीसाठी लिहीताना, हे रंगबेरंगी गुलाब पाहताना नागरिकांना त्यांची छबी मोबाईलमध्ये टिपण्याचा मोह आवरत्या नाही असे लिहिले आणि निवेदकाने तेवढ्याच कलात्मक पद्धतीने सांगितले तर त्याचा परिणाम अधिक आहे होतो. दूरचित्रवाणीमध्ये तीन प्रकारच्या बातम्यांचे सादरीकरण होते.

अँकर व्हिज्युअल (av), अँकर व्हिज्युअल बाईट (avb) आणि पॅकेज स्टोरी. अँकर व्हिज्युअल बातमीमध्ये निवेदक बातमी सांगत असताना दृश्ये दिसत असतात

Anchor : आता एक दिलासादायक बातमी.... मुंबईमध्ये कोरोनाबाधित मा दीड महिन्याच्या बाळाला आणि त्याच्या चार वर्षाच्या मोठ्या भावास उपचारानंतर सुखरूप घरी सोडण्यात आलंय. बाळाला ताप आल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांची चाचणी होतली असता त्यांना कोरोनाची लागण झाल्याचं स्पष्ट झालं. मात्र उपचारानंतर त्यांनी कोरोनावर मात केली.

ही बातमी निवेदक वाचत असताना मुले घरी जात असतानाची दृश्य दिसतात.

अँकर व्हिज्युअल बाईट (avb) बातमीमध्ये निवेदक बातमी

सांगत असताना स्क्रीनवर दृश्य दिसत असते तर त्याचवेळी त्या घटनेशी संबंधित व्यक्ती काही बोलत्या असेल तर तिचे बोलणे (बाईट) दाखवले जाते.
उदाहरणार्थ

Anchor : पिंपरी चिंचवडमधील लघुउद्योग सुरू करण्यासाठी अखेर परवानगी मिळालीय. त्यामुळे गेले दीड महिन्याहून अधिक काळ औद्योगिक नगरीचे थांबलेले उद्योग चक्र पुन्हा सुरू होणार आहे... पण त्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियम पाळावे लागणार आहेत.

वि ओ - (voice over) ... कोरोना संकटादरम्यान सुरूवाती - पासूनच पिंपरी चिंचवड रेडझोन - मध्ये आहे. त्यामुळे औद्योगिक नगरीतले सर्वच उद्योग बंद करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातल्या उद्योगांना परवानगी मिळाली होती. पण रेडझोन असल्याने पिंपरी चिंचवड मधले उद्योग बंद होते. ज्या कंपन्यांवर शहरातील लघु उद्योग टिकला होता त्या मोठ्या कंपन्या सुरू झाल्याने शहरातील कंपन्या सुरू करण्याची मागणी होत होती. लघु उद्योग सुरू झाले नाहीत तर ते बंद पडण्याचा धोका होता. पण अखेर राज्यसरकारने रेडझोनमध्ये येत असलेल्या पिंपरी चिंचवड मधल्या उद्योगांना सुरू करण्याची परवानगी दिलीय. अर्थात त्याला अनेक नियम लागू करण्यात आले आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे केवळ ३३ टक्के कर्मचारी ठेवणे, रेडझोनमधला कर्मचारी किंवा मालक ही कंपनी सुरू करू शकणार नाही. अशा विविध अटी ठेवण्यात आल्या आहेत. अर्थात या निर्णयाचे लघु उद्योग संघटनेकडून स्वागत करण्यात आले आहे.

बाईट - : संदीप बेलसरे, अध्यक्ष, लघु उद्योग संघटना

वि ओ - : तर पालिका प्रशासनाने कंपन्यांनी सर्व नियमांचे पालन करावे अशा सूचना दिल्या आहेत ...

बाईट - : श्रावण हर्डीकर, आयुक्त

वि ओ - : ज्या लघुउद्योगांमुळे पिंपरी चिंचवडची ओळख कामगारनगरी झालीय, त्याच शहरात लघु उद्योग

बंद झाल्याने मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. पण आता कंपन्या सुरू होत असल्याने व्यवसायिकांनी समाधान व्यक्त केलंय. पण जरी उद्योग सुरू होत असले तरी कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक कंपनी प्रशासनाने नियमांची आणि कामगारांची काळजी घ्यावी हीच अपेक्षा (वार्ताहार)

अर्थात प्रत्येक वेळी बातमी याच पद्धतीने लिहिली जाईल असे नाही. पालखी सोहळा किंवा दिपावली, होळीसारख्या उत्सवात शब्दांपेक्षा दृश्यांवर भर दिला जातो. आणि त्याआधारे बातमी लिहिली जाते.

दिवाळीमध्ये दीपोत्सवाची बातमी असेल तर त्यात दृश्यच इतकी बोलकी असतात की त्यात जास्त वर्णन करण्याची गरज पडत नाही. अगदी थोडक्या शब्दात त्याचे वर्णन करता येऊ शकते.

दिवाळीला 'लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' असं का म्हणतात याचा अनुभव पुणेकरांनी घेतला...! शहरात आज दिवाळी आज पाडण्याच्या निमित्तानं विविध ठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं. शनिवारवाड्यावरही हजारो दिवे लावत दीपोत्सव साजरा करण्यात आला...! हजारो दिव्यांनी शनिवारवाडा प्रसन्न झाला.

पालखी प्रस्थानाची बातमी असेल तर ही दृश्य अधिक बोलकी असतात.

आज दुपारच्या सुमारास विठू नामाच्या गजरात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूराकडे प्रस्थान केले. प्रस्थान सोहळ्यासाठी राज्यातल्या कानाकोपऱ्यातून लाखो वैष्णव देहू नगरीत दाखल झाले. यावेळी टाळमृदंग आणि विठू नामाच्या गजराने वातावरण भारून गेले.

चित्तवाणीमध्ये या तीन पद्धतीने बातमी सादर केली जात असली तरी अलीकडच्या काळात वॉल्कथू आणि चौपाल या दोन पद्धतीत ही बातम्या सादर केल्या जातात.

वॉल्क थू म्हणजे एखाद्या घटनेचे वार्ताहराने केलेले वर्णन

उदाहणार्थ : पुण्याच्या मानाच्या कसबा गणपतीची विसर्जन मिरवणूक असेल तर संपूर्ण घटनाक्रम वार्ताहराच्या [illegible] वर्णन करण्याला लावला जाते जसे : पुण्यात मानाच्या

PAGE NO.:
DATE / /

पहिल्या कसबा गणपतीच्या मिरवणुकीला सुरुवात झालेली आहे. या मिरवणुकीत नेमका कसा उत्साह आहे हे सांगत आहेत आमचे प्रतिनिधी अबक

--- या नंतर वार्ताहर मिरवणुकीचे वर्णन करत असताना कॅमेरामन वर्णनानुसार दृश्य दाखवतो.

चौपाल म्हणजे एखाद्या घटनेनंतर सर्वसाधारणपणे त्या क्षेत्राशी निगडित व्यक्तिंच्या समूहाशी वार्ताहर चर्चा करतो.

PAGE NO.:
DATE

Smt. V.D.Sr.Clg. Daulatnagar(Marali)

# बाळासाहेब देसाई फॉंडेशन संचालित

## श्रीमती विजयादेवी देसाई मिनिअर कॉलेज, दौलतनगर, मरळी ता. पाटण, जि. सातारा

[redacted] Group - Project

सन - 2022-2023

विद्यार्थ्याचे नाव : सुर्यवंशी प्रतिभा पांडुरंग

PRN No : 2020056988

सिट नं. : 46459

वर्ग : B.A. III (C.B.C.S.) Marathi

विषय : मराठी XVI

घटक : वाङ्मय प्रकारचे अध्ययन (व्यक्तिचित्रे)

दिनांक - : 28/5/2023

मार्गदर्शकाचे नाव : श्री. पाटील के.बी.

Subject teacher sing -

Student sing - Pratibha

PAGE NO.:
DATE
Smt. V.D. Sr. Clg.

# मान्यवरांचे व्यक्तिचित्रण / लेख

## बाळासाहेब ठाकरे

बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे हे संस्थापक, तसेच प्रमुख संपादकही होते.

23 जानेवारी, इ.स. १९२७ मध्ये प्रबोधनाची परंपरा असणाऱ्या घरात, पुणे येथे बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म झाला. त्यांचे वडील केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे त्या काळात आपल्या लेखनातून, वक्तृत्वातून तसेच कार्याच्या माध्यमातून लोकजागरणाची धुरा सांभाळत होते. प्रबोधनकार अन्यायकारक रूढी-परंपरांवर व जातिभेदात्मक वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला चढवत होते. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण होते. प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा प्रबोधनकारांचा वारसा बाळासाहेबांमध्येही ठसत-नकळतपणे उतरला होता.

सर्वप्रथम एक कलाकार म्हणून - एक व्यंगचित्रकार म्हणून - त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. इ.स. १९५० मध्ये ते 'फ्री प्रेस जर्नल' मध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काल काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी चित्रे - व्यंगचित्रे - जाहिरातींचे डिझाइन या क्षेत्रांतही काम करीत असत. त्यांच्या व्यंगचित्रात इंदिरा गांधींची व्यक्तिरेखा आवडती होती

# * लोकनेते बाळासाहेब देसाई *

लोकनेते बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्रातील प्रख्यात राजकारणी आणि सामाजिक कार्यकर्ते होते. बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्राचे गृहमंत्री, शिक्षणमंत्री आणि महाराष्ट्र राज्य सरकार मधील इतर महत्त्वपूर्ण पदे त्यांनी भूषवली आहेत. सुरुवातीच्या काळात बाळासाहेब देसाई महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंत्री होते. सन १९६२ मध्ये कोल्हापूर येथे स्थापनेमध्ये बाळासाहेब देसाई यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. आणि बाळासाहेब देसाई यांचे विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान आहे.

बाळासाहेब देसाई यांचा जन्म १० मार्च १९१० मध्ये सातारा जिल्ह्यातील विहे तालुक्यातील पाटण या गावात झाला बाळासाहेब देसाई यांचे एस एस बी पर्यंतच शिक्षण झाले होते. त्यांनी सन १९३७ ते १९७० या दरम्यान कराड येथे वकिली व्यवसाय केला. सन १९३९ मध्ये बाळासाहेब देसाई सातारा जिल्ह्यातील लोकल बोर्डाचे सदस्य बनले सन १९५२ मध्ये बाळासाहेब देसाई पाटण येथून विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. या कालावधीमध्ये बाळासाहेब देसाई यांनी आपली भूमिका अत्यंत अचूक पद्धतीने पूर्ण केली.

मध्यंतरी बोर्डाची आर्थिक स्थिती खालावली होती अशावेळी सरकारी मंजुरीचे अपेक्षेवर काढलेल्या पंचावन्न शाळा व ३८८ शिक्षकांचा पश्न त्यांनी कुशलतेने सोडविला. कोयना धरण योजनेला आर्थिक प्रशासकीय मनुष्यबळ आणि इतर सर्व प्रकारची मदत मिळवून देण्यासाठी बाळासाहेब देसाई यांनी पुढाकार घेतला होता. तसेच आर्थिक दृष्ट्या मागास मुलांना शिक्षण घेणे शक्य नव्हते म्हणून ज्या पालकांचे

वार्षिक उत्पन्न बाराशे रुपयाच्या आत आहे अशा गरीब व मागासलेल्या पालकांच्या मुलांसाठी सर्व शिक्षण मंत्री म्हणून बाळासाहेब देसाई यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. या व्यतिरिक्त त्यांनी सैनिकी व तांत्रिक ग्राम शिक्षणास महत्त्व देणे योग्य ठरवले. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेत बाळासाहेब देसाई यांचा मोलाचा वाटा होता.

अशा या महान लोकनेत्यास माझे विनम्र अभिवादन.

# यशवंतराव चव्हाण

## पुण्यतिथी -:

यशवंतराव चव्हाण यांची आज 38 वी पुण्यतिथी, मुख्यमंत्र्यांनी केलं अभिवादन, प्रितीसंगमावर राजकीय नेत्यांची हजेरी

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची आज 38 वी पुण्यतिथी आहे. यानिमित्त प्रितीसंगमावरील समाधीस्थळी अभिवादन करण्यासाठी अनेक राजकीय नेत्यांनी हजेरी लावली.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी शेती, उद्योग, शिक्षण, सहकार सिंचन या क्षेत्रात मोठं काम केलं आहे. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराड्च्या प्रितीसंगमावरील समाधीस्थळी अभिवादन करण्यासाठी अनेक राजकीय नेत्यांनी हजेरी लावली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील प्रितीसंगमावर जावून यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

उदय सामंत, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, आमदार जयकुमार गोरे आमदार महेश शिंदे उपस्थित होते. समाधीस्थळी आकर्षक फुलांनी सजावट करण्य आली आहे. सकाळपासून नागरिकांनी प्रितीसंगमावरील समाधीस्थळी यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली आहे. सकाळपासून नागरिकांन प्रितीसंगमावरील समाधीस्थळी राजकीय नेत्यांनी देखील यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केले. याम सातऱ्याचे खासदार श्रीनिवास पाटील, खासदार उदयनर भोसले, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, नरेंद्र पाटील या नेत्यांनी प्रितीसंगमावर जावून अभिवादन केलं.

शेती, सहकार, शिक्षण, औद्योगिक या क्षेत्रांत अने लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करत यशव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राचा विकास केला. महाराष्ट्रा विकासात्मक जडणघडणीत त्यांनी भरीव योगदान दिले. यशवंतराव चव्हाण यांना पुण्यतिथी दिनी विनम्र अभिवा असं ट्वीट शरद पवार यांनी केलं आहे. तसेच केंद्रीय मं नितीन गडकरी यांनी देखील यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं आहे. त्याचबरोबर काँग्रेसचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही ट्वीट करत यशवंतरा चव्हाण यांना अभिवादन केलं आहे.

यशवंतराव चव्हाण साहेबांनी रचलेल्या पायावर आजचा आधुनिक, प्रगत, पुरोगामी महाराष्ट्र उभा असल्याचे म्हणत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी त्यांना अभिवादन केलं आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पका राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहे शेती, उद्योग, व्यापार शिक्षण सहकार, सिंचन, आरोग्य अनेक क्षेत्रात महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया केला, क्रीडा साहित्य संस्कृतिकदृष्ट्या समृद्ध महाराष्ट्र घडवला. समाजातील भागास, आदिवासी, अल्पसंख्याक महिला, युवक या समाजघटकांना मुख्य प्रवाहात आ विकासाची संधी दिली. महाराष्ट्राच्या राजकारण, समाज सुसंस्कृत चेहरा दिल्याचे अजित पवार म्हणाले.

Shivaji University, Kolhapur

Balasaheb Desai Foundation

Page No.
Date

Smt. Vijayadevi Desai Sr. College
Daultnagar

B.A. III - Summer Exam - 2022/2023

Internal Exalution - Group Project

Name of student - Pournima Mahadev Ghadage

Exam Seat No - 46457

Name of Project - Marathi XII

Name of Guide Assit prof. -
सौ. पाटील के.बी.

Date of Project submission - 29/05/2023
सौ

student sing - Ghadage P.M.

Subject Teacher sing -

Smt. V.D. Sr. College

## लेखकाची मुलाखत :-

माझ्या आवडीचे लेखक आहेत विश्वास पाटील त्यांच्या कांदबऱ्या मी आवडीने वाचते. म्हणून मी कल्पना केली की, मला विश्वास पाटलांची मुलाखत घ्यायची संधी मिळाली तर मी त्यांना काय प्रश्न विचारीण व ते कशा पद्धतीने उत्तर देतील - ती काल्पनिक मुलाखत मी घेत आहे.

1) प्रश्न :- आपला जन्म कुठे झाला ?

विश्वास पाटील :- माझा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील सेर्ले नावाच्या छोट्याशा खेड्यात झाला.

2) प्रश्न :- एक लेखक म्हणून आपली जडण - घडण कशी झाली ?

विश्वास पाटील :- माझ गांव अगदी छोट खेडं वस्ती असेल हजार बाराशे ! पण सातवी पर्यंत शाळा होती. तिथंच माझ प्राथमिक शिक्षण झाली. लहान असल्या पासून मला सुट्टीत गुराख्याच काम करावं लागायच. त्यामुळे निसर्गाशी माझा घनिष्ट संबंध आला.

खर म्हणजे माझ सगळ बालपण, माझ्या गावा - घरान मला जी पार्श्वभूमी दिली ती माझ्या सगळ्या लेखनाची शिदोरी ठरली.

③ प्रश्न :- लेखक होण्यासाठी किंवा लेखक म्हणून कोणाचे व कोणते संस्कार उपयोगी पडले ?

विश्वास पाटील :- आमच्या गावात मला जस निसर्गाच देण दिल तसच मला साहित्यकृतीच्या आकृती बंधाच, रचनेच ज्ञान हि न कळत मला आणून दिला. तावण महिण्यात आमच्या घरात ग्रंथ लावला जायचा. तो ग्रंथ

- वाचायचं काम मला करावं लागायचं. त्य
(ग्खाद्या साहित्य कृतीच्या प्लॉट किती गुं
- गुंतीचा आहे, अवाढव्य असतो, याच भा
आलं होत. त्या वाचनाची सुरुवात जरी ज
- दस्तीने करून घेतली असली तरी त्यात
हळूहळू रंगून गेले होतो. हे मात्र खरं.
मला वाटत माझ्या मनात कुठतरी रचे
बीजारोपन होत गेल असाव.

4) प्रश्न :- लेखक म्हणून लेखनाची सुरुवात कशी झाली

विश्वास पाटील :- १९७५ ला 'कायदा' नावाची कथा "
तरुण भारत" च्या वासंतिक अंकात प्र
झाली. तेथूनच पुढे माझ्या साहित्या
लेख प्रपंच सुरू झाला. इ-१० वी च्य
वर्गात असताना लिहीलेल्या कथेला
बक्षीस मिळाले. पुढे कॉलेजात गेल्या
'बिल्वदल' अंकातून 'भाकरीची कथा',
दिवाळी अंकातून 'दिशा', विद्यापीठाच्
अनुदानातून 'आंबी' कादंबरी तसेच महा
विद्यालयात असतानाच 'क्रांतीसूर्य' हि ना
पाटील यांच्या वरील कादंबरी लिहीली म
विशेषत्वाने कुणाचे तिकडे लक्ष वेधले ना
पुढे 'पानिपत', 'पांगिरा', 'झांडा झडती',
'महानायक', 'रणांगण' या कादंबरी, नाटक
प्रसिद्ध झाली.

5) प्रश्न :- कादंबरी आणि इतिहास (वास्तव आणि ऐतिह
सत्य) या मध्ये आपण कोणता फरक मानता ?

विश्वास पाटील :- इतिहासात दस्तऐवज, माहिती, सनावळी,
तहाच्या अटी त्यांचे तपशील असतात.
कादंबरी जीवनाचा परीघ मानणारी असत
पात्र, वातावरण यांना जीवंत रूप दिलेले अस

9) प्रश्न :- कादंबरी वाचताना परिणाम आणि नाट्य प्रयोगाचा परिणाम यामध्ये आपल्याला अपेक्षित परिणाम कशामुळे साधला गेला?

विश्वास पाटील :- कादंबरीचा परिणाम साधण्याची संपूर्ण जबाबदारी लेखकाची असते. विशेषतः ऐतिहासिक कादंबरी लिहिताना त्याला फार भावनाविवश होऊन चालत नाही. कादंबरीचा विषय, आशय यांचा समतोल साधावा लागतो तर नाटक हि सांघिक प्रक्रिया असलेने तिथे सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. त्या दृष्टीने नाटकाचा परिणाम साधला जातो. नाटक हि शेवटी एका लेखकाची निर्मिती असली तरी अपेक्षित परिणाम साधण्यासाठी त्याला इतरांच्यावर अवलंबून रहावे लागते. त्या दृष्टीने नाटकाचे दिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीत, वेशभूषा, केशभूषा यातून परिणाम साधला जातो.

10) प्रश्न :- तुम्ही नकारात्मक प्रतिक्रीयांना कसे सामोरे जाता?

विश्वास पाटील :- मी शक्यतो प्रतिक्रीया बघत नाही विशेषतः नकारात्मक, मी माझ काम करत असतो. माझ लेखन कस वाटल हे लोकांनी ठरवायच असत.

11) प्रश्न :- नवोदित लेखकांना काय सल्ला द्याल?

विश्वास पाटील :- नवोदित लेखकांनी यशाची घाई न करता तपश्चर्या, आराधना करायला हवी. मेहनत घेतली, श्रम केले तर

Shivaji University, Kolhapur

Page No.
Date

- काहीच अवघड नाही लेखकांनी इतरांच्या आयुष्यात डोकावून बघायला हवे. त्यांच्या अनुभवातून शिकायला हवे. आपल्या शब्दां-
- वर विश्वास ठेवायला हवा.

खरचं मला जर माझ्या आवडीच्या लेखकाची मुलाखत घ्यायची संधी मिळाली असती तर मला मी हेच प्रश्न विचारले असते. सध्या तरी कल्पनाच करते.

seen

# BALASAHEB DESAI FOUNDATION's

**Smt. Vijyadevi desai Senior College ,Daulatnagar**

**Department of Chemistry**

## Notice

**Date : 19/04/ 2019**

All the students of Bsc III Chemistry are here by informed that it is mandatory to submit the Assingned **project** work on or before **29th April 2019** the internal assessment for **semester VI .**

RShirke
**HOD**
**Chemistry**
Smt.Vijayadevi Desai Sr. College

**I/C Principal**
Smt. Vijayadevi Desai Sr. College
Daulatnagar,Tal.Patan.Dist.Satara

Smt. V.D. Sr. College (Daulatnagar)

# Department of Chemistry

## Project Attendence 2018-19

| Sr.No. | Student Name | Project Name |
|---|---|---|
| 1 | TIKUDAVE MANOJ TANAJI | Analysis of Soil |
| 2 | SALUNKHE PRIYANKA ATAMARAM | |
| 3 | GHADAGE ARJUN SANJAY | |
| 4 | KADAM AJAY CHANDRAKANT | |
| 5 | PATIL TANAJI SADASHIV | |
| 6 | GHARAL ANIKET ANIL | Analysis of Soil |
| 7 | PAWAR NILESH DATTATRAYA | |
| 8 | LONDHE JAGRUTI MAHENDRA | |
| 9 | PAWAR AKSHAY JAYAWANT | |
| 10 | PAWAR SUVARNA NAVNATH | |
| 11 | KAMBLE SUMEDHA SHIVAJI | Analysis of Potable Water |
| 12 | MORE SONALI ANIL | |
| 13 | Jadhav Rajendra Sanjay | |
| 14 | DESHMUKH KOMAL NIWAS | |
| 15 | DESAI VIKRAM VIKAS | |
| 16 | MORE AKSHAY MOHAN | Analysis of Potable Water |
| 17 | SHIRKE KAJAL SURESH | |
| 18 | DESAI JYOTI LAXMAN | |
| 19 | PANASKAR MAHESH JANARDAN | |
| 20 | Patil Komal Suresh | |
| 21 | patil Priyanka Mahadev | |
| 22 | Shejwal Arachana Ashok | Analysis of Potable Water |
| 23 | Varpe Rajan Baban | |
| 24 | CHAVAN SONALI DILIP | |
| 25 | Kadam Kiran Nathuram | |
| 26 | JAGTAP PRATIK DADASO | Preparation Of Soap |
| 27 | SURYAWANSHI SUJIT RAJARAM | |
| 28 | SHIRKE KISHOR SHIVAJI | |
| 29 | SURYAWANSHI PRADNYA ASHOK | |
| 30 | JADHAV AKSHAY ASHOK | |
| 31 | JADHAV PRADNYALI NARAYAN | |
| 32 | KACHARE CHETAN SURESH | Estimation of Iron From Soap |
| 33 | KUMBHAR JAYSHREE NAMADEO | |
| 34 | MOHITE PRIYANKA ANANDA | |
| 35 | DESHMUKH SURAJ BABAN | |
| 36 | SHERE ROHINI SHANKAR | |
| 37 | THORAT NITA SHIVAJI | |
| 38 | JADHAV DIPALI BHAGVAT | |

| | | |
|---|---|---|
| 39 | SHIDRUK RESHMA ADHIK | Antacid Tablet |
| 40 | SURYAWANSHI ARJUN PRAKASH | Antacid Tablet |
| 42 | NANGARE SHUBHAM PARSHARAM | |
| 43 | JADHAV DNYANESHWAR SHANKAR | |
| 44 | SHEJVAL SURAJ SHANKAR | |
| 45 | VIBHUTE JAYPRAKASH JAGDISH | |

Rshirke
HOD
Chemistry
Smt.Vijayadevi Desai Sr. College

I/C Principal
Smt. Vijayadevi Desai ... College
Daulatnagar,Tal.Patan,D...

SMT. V.D. Sr. College Daulatnagar (Maraf)

Balasheb DesaiFoundation's

# Smt. Vijydevi Desai Sr.College,Daulatnagar

## Project Report On

## " Analysis of Potable Water"

**A Project report sUbmited for the partial fulfillment of the awared of the degree of**

**Bachelor of Science By**

## Deparetment of Chemistry

## Submitted By ,

***Shejwal Arachana Ashok***

***Varpe Rajan Baban***

***Varpe Rajan Baban***

***Kadam Kiran Nathuram***

***Under The guidance Of***

**Prof. Shejwal.J.P**

**Assit.Prof.Department of Chemistry**

**Smt. V.D.C Daulatnagar**

**Year 2018-19**

Balasaheb Desai Foundation's

Smt. Vijydevi Desai Sr.College,Daulatnagar

Deparetment of Chemistry

# *Certificate*

This is to certify that , ***Shejwal Arachana Ashok , Varpe Rajan Baban, Varpe Rajan Baban, Kadam Kiran Nathuram*** Have Successfully completed the Project Report on " Analysisof Potable Water " For the Partial Fulfillment for the Bachelor of Science in Chemistry and **Smt. Vijydevi Desai Sr.College,Daulatnagar.**Afiliated to Shivaji University during the academic year 2018-19.Under guidance prof.Thorat .J.P.and satisfactorily carried out and completed projects work for the degreeof Bsc in Chemistry

**To the best of My Knowledge andBelief, that is their orginal Work and submitted earlier anywhere for any purpose .**

**Date** 28/ 04 /2019/

**Place:** Daulatnagar

Thorat J.P.

**Prof. Thorat.J.P**

**Examiner**

Rshirke HOD

**HOD**

Chemistry

Smt.Vijayadevi Desai Sr. College

# *ACKNOWLEDGEMENT*

Smt.V.D.Sr.Colleg
Daulatnagar(Maha

We Take this opportunity to thanks all those who has directly inspired,direcred and helped us towards successfully completion of this project report .

